



आश्रमभजनावलि

नारायण मोरेश्वर खरे

https://epustakalay.com/book/62347-aashrambhajnavali-by-narayan-moreshwar-khare/

**पंडित नारायण मोरेश्वर खरे : “ वैष्णव जन तो तेने कहिये” चे संगीतकार**

**डॉ. कीर्ती आगाशे**

जुलै १९१४ च्या  सुमारास महात्मा गांधी आफ्रिकेतून भारतात परत आले आणि १९१७ मध्ये त्यांनी अहमदाबादला  साबरमती आश्रमाची स्थापना केली . या आश्रमाला त्या काळी “सत्याग्रह आश्रम” असं पण म्हणलं जायचं. या आश्रमाच्या सात्विक आणि अहिंसेने प्रेरित वातावरणात रोज संगीतमय प्रार्थना आणि भजनाचा सामावेश हवा अस गांधीजीना वाटू लागलं.  यासाठी त्यांनी पंडित विष्णु दिगंबर पलुस्करांना  एका सात्त्विक कलाकाराला पाठविण्याची विनंती केली, तेव्हा पलुस्करांनी नारायण मोरेश्वर खरे या आपल्या गुणवान, सात्विक संस्कारी  आणि  संगीतज्ञ पट्टशिष्याला  अहमहाबादला पाठवलं आणि साबरमती नदीकिनारी वसलेल्या महात्मा गांधींच्या आश्रमाने, अभिजात संगीत आणि जाज्वल्य देशभक्ती यांचा अनोखा संगम,पंडित नारायण मोरेश्वर खरे यांच्या रुपात अनुभवला !!

पंडित  खरे  यांचा जन्म,  १८८९ साली सातारा जिल्ह्यातील तासगाव खेड्यात एका सामान्य ब्राम्हण कुटुंबात झाला . मधुर कंठाची देणगी असलेले नारायण खरे मंदिरात कीर्तन करत . त्यांची संगीताची उपजत समज पाहून मिरजेच्या राज दरबाराकडून त्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली . नारायण खरे मॅट्रिकला असताना पंडित विष्णू दिगम्बर पलुस्करांनी त्यांचं गायन ऐकलं. त्याच वेळी हा युवक मोठा कलाकार  बनेल हे पलुस्करांना मनोमन जाणवलं आणि त्यांनी मिरजेच्या राजांना सांगून या युवकाला मुंबईला आणलं . पलुस्करांच्या गांधर्व विद्यालयातील ९ वर्षाचा अभ्यासक्रम केवळ ४ वर्षात पूर्ण करून त्यांनी “ संगीत प्रवीण” पदवी प्राप्त केली.१९१२

साली पलुस्करांनी मुंबईच्या गांधर्व महाविद्यालयाचे आचार्य म्हणून त्यांची नियुक्ती केली. पण नारायण खरे यांचा या पेक्षाही वेगळा प्रवास नियतीने ठरवलेला होता आणि त्याची सुरवात १९१८ साली साबरमती आश्रमात झाली .

पं. खरे यांनी आश्रमातील सकाळी आणि संध्याकाळी होणाऱ्या प्रार्थनेची जबाबदारी घेवून साबरमती आश्रमाचं वातावरण संगीताने भारून टाकलं. समर्पक वृत्तीने संगीत साधना आणि अध्यापन करणाऱ्या पं. खरे यांनी आता देशभक्ती आणि राष्ट्सेवेसाठी आपलं जीवन वाहून घेतलं. राष्ट्रीय कार्य आणि शिक्षणात संगीताच्या भूमिकेचा अभ्यास करून आश्रम जीवनात, सत्याग्रह यात्रेत उपयुक्त होतील अशा प्रार्थना , भजनं, भक्तीगीतं यांचा संग्रह करून, ती शास्त्रीय राग आणि तालात बसवून त्याचा संग्रह " आश्रम भजनावली " या नावाने प्रकाशित केला . याचबरोबर लहान मुलांसाठी "बालाविनोद संगीत रागदर्शन" याचे तीन भाग त्यांनी प्रकाशित केले. त्यांनी रागांग वर्गीकरणाची स्वतंत्र पद्धत निर्माण केली. कारण संगीतातील राग वर्गीकरण पद्धतीसाठी पंडित भातखंडे यांनी शोधलेल्या १० थाट पद्धतीत सर्व राग समाविष्ट होवू शकत नव्हते . ही त्रुटी दूर करण्यासाठी पंडित नारायण खरे यांनी सर्व रागांचा सूक्ष्म अभ्यास करून ३० स्वरसमुदायांची निवड केली आणि सर्व रागांचं विभाजन ३० रागांगांमध्ये केलं. संगीत क्षेत्रातील हे मोठं योगदान मानलं जातं .

पंडित नारायण खरे यांच्या " आश्रम भजनावली " च्या आवृत्या आजही प्रकाशित होत आहेत . या साहित्यात सुमारे ४०० भजनांचा संग्रह आहे.यातील एक भजन "वैष्णव जन तो तेने कहिये" हे नरसी मेहता यांचे १५व्या शतकात रचलेलं गुजराथी भाषेतील भजन आहे. पंडित खरे यांनी "खमाज" रागात स्वरबद्ध केलेलं हे भजन गांधीजीना अतिशय आवडायचं आणि ते रोज प्रार्थनेत गायलं जायचं . १९३० च्या मार्च महिन्यात, दांडीयात्रेत सहभागी झालेल्या पहिल्या ८० जणांच्या तुकडीमध्ये पंडित नारायण खरे आणि काकासाहेब कालेलकर अग्रस्थानी हे भजन गायचे . संपूर्ण दांडी यात्रा या स्वराने पावन झाली. आजही महात्मा गांधीचं नाव आणि "वैष्णव जन" भजन अविभक्त आहेत. पंडित खरे यांचं अवघ्या ४९ वर्षी ऐन उमेदीत हरिपुरा (गुजरात) इथे अल्प आजाराने निधन झालं. त्या दिवशी महात्मा गांधींचं मौनव्रत सुरु होतं. त्यांच्या निधनाने गांधीजींना खूप दुःख झालं. एका कागदावर " दुसरे पंडितजी मिळणं अशक्य. उत्तम संगीत आणि श्रेष्ठ नीतीचा मेळ आपल्याला कुठे मिळणार ?" हा त्यांनी लिहिलेला संदेश खूप बोलका होता.

आज काळाच्या ओघात, माहितीच्या महाजालात "वैष्णव जन तो तेने कहिये" शोधताना या भजनाचे रचनाकार म्हणून संत कवी नरसी मेहतांच नाव दिसतं, पण याला स्वरांचं संस्कारण करणाऱ्या संगीतकार पंडित नारायण मोरेश्वर खरे यांच नाव खूप शोध केला तर अप्रत्यक्ष आढळतं. म्हणूनच हे पुनः संस्मरण !!!!